## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

## (दिनांक 04.08.2018 रोजीची पुढे ढकलण्यात आलेली स्थायी समितीची सभा)

दिनांक 08.08.2018 सकाळी 12.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशाकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| स. शेर अली अ. महेबुब अली | देशमुख सतिश पुंडलीकराव |
| येवनकर मोहीनी विजय | तिडके प्रशांत विठ्ठल |
| अ. लतीफ अ. मजीद | रावत भानुसिंह गयादिनसिंह |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ |
| गोडबोले ज्योत्सना राजु | वैशाली मिलींद देशमुख |

**सभापती** दिनांक 08.08.2018 च्या सभेचे कामकाज संपल्यामुळे दिनांक 04.08.2018 रोजीची पुढे ढकलण्यात आलेली मनपा स्थायी समितीच्या सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्रं.01**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये गणेशनगर भागात गणेशनगर Y-POINT ते रेस्ट हाऊस रोड पर्यंत डांबरीकरण करणे (रु. 76,17,700/-)**

**संदर्भ :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/663/18 दि. 16.04.2018**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये गणेशनगर भागात गणेशनगर **Y-POINT** ते रेस्ट हाऊस रोड पर्यंत डांबरीकरण करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 76,17,700/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/843/2018 दिनांक 19.04.2018 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/ दैनिक सामना (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत या वृत्तपत्रात दिनांक 20.04.2018 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 12.06.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | -- |
|---|---|---|---|
| 01 | जी.जे. कन्स्ट्रक्शन नांदेड | 0.99% कमी | L1 |
| 02 | ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड | 7.21% जास्त | L2 |
| 03 | कामारीकर कन्सट्रक्शन | 9.53% जास्त | L3 |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्ट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. करिता सदर कामासाठी जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समितीसभे समोर सादर.

**भानुसिंग रावत** या रस्त्याबरोबरच गणेश टॉकीजचा रस्ताही करण्यात यावा हा रस्ता खुप खराब झालेला आहे याची मा. आयुक्त महोदयांनी स्थळ पहाणी करावी.

**सभापती** प्रशासना सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**ठराव क्रं. 47** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये गणेशनगर भागात गणेशनगर Y-POINT ते रेस्ट हाऊस रोड पर्यंत डांबरीकरण करणे (रु. 76,17,700/-)**

**संदर्भ :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/663/18 दि. 16.04.2018**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये गणेशनगर भागात गणेशनगर **Y-POINT** ते रेस्ट हाऊस रोड पर्यंत डांबरीकरण करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 76,17,700/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/843/2018 दिनांक 19.04.2018 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/ दैनिक सामना (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत या वृत्तपत्रात दिनांक 20.04.2018 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 12.06.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | -- |
|---|---|---|---|
| 01 | जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 0.99% कमी | L1 |
| 02 | ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड | 7.21% जास्त | L2 |
| 03 | कामारीकर कन्सट्रक्शन | 9.53% जास्त | L3 |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्ट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. करिता सदर कामासाठी जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.02**

**विषय :-** **<u>नावाशमनपा जलशुध्दीकरणासाठी IS-15573-2018, 100 मेट्रीक टन PAC पॉवडर पुरवठा करणे बाबत</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जलशुध्दीकरणासाठी IS-15573-2018 चे मानकानुसार 100 मेट्रीक टन पी.ए.सी. पॉवडर पुरवठा करणे या कामासाठी चौथ्यांदा निविदा मागविली असता एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. एस.व्ही.एस. केमीकल्स कार्पोरेशन पुणे यांची असुन ती रुपये 37,950/- प्रति मेट्रक टन या दराची आहे. सदरील निविदा धारकास दर कमी करणेसाठी पाचारण केले असता त्यांनी वाटाघाटी अंती दर कमी करुन रुपये 37,600/- प्रति मे.टन या दराने मालाचा पुरवठा करण्याची समंती दिलेली आहे.

सदरील कमी केलेले दराप्रमाणे 100 मेट्रीक टन परिमाणसाठी रुपये 37,600/- प्रति मे.टन दरानुसार रुपये 37,60,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष साठ हजार फक्त) इतकी निविदा किमंत होत आहे.

करिता **मे.एस.व्ही.एस. केमीकल्स कार्पोरेशन पुणे यांची रुपये 37,600/- प्रति मे.टन या दराने रुपये 37,60,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष साठ हजार फक्त) इतक्या किमंतीच्या निविदेस प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीचे सभे समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 48** **ठराव**

**विषय :-** **<u>नावाशमनपा जलशुध्दीकरणासाठी IS-15573-2018, 100 मेट्रीक टन PAC पॉवडर पुरवठा करणे बाबत</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जलशुध्दीकरणासाठी IS-15573-2018 चे मानकानुसार 100 मेट्रीक टन पी.ए.सी. पॉवडर पुरवठा करणे या कामासाठी चौथ्यांदा निविदा मागविली असता एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. एस.व्ही.एस. केमीकल्स कार्पोरेशन पुणे यांची असुन ती रुपये 37,950/- प्रति मेट्रक टन या दराची आहे. सदरील निविदा धारकास दर कमी करणेसाठी पाचारण केले असता त्यांनी वाटाघाटी अंती दर कमी करुन रुपये 37,600/- प्रति मे.टन या दराने मालाचा पुरवठा करण्याची समंती दिलेली आहे.

सदरील कमी केलेले दराप्रमाणे 100 मेट्रीक टन परिमाणसाठी रुपये 37,600/- प्रति मे.टन दरानुसार रुपये 37,60,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष साठ हजार फक्त) इतकी निविदा किमंत होत आहे.

करिता **मे.एस.व्ही.एस. केमीकल्स कार्पोरेशन पुणे यांची रुपये 37,600/- प्रति मे.टन या दराने रुपये 37,60,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष साठ हजार फक्त) इतक्या किमंतीच्या निविदेस प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. 03**

**विषय :-** **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे रुपये 55,45,000/-**

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश जा.क्रं. 3152/18 दिनांक 06.06.2018

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 55,45,000/- करिता निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/3194/18 दिनांक 07.06.2018 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/दैनिक उद्याचा मराठवाडा या वृत्तपत्रात दिनांक 08.06.2018 अन्वये निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा समितीसमोर दिनांक 12.07.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | -- |
|---|---|---|---|
| 01 | बी.जी. भास्करे, नांदेड | 0.99% कमी दर | L1 |
| 02 | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | अंदाजपत्रकीय दर | L2 |

| | | | |
|---|---|---|---|
| 03 | सयीम कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% जास्त दर | L3 |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार बी.जी. भास्करे नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. **करिता सदर कामासाठी बी.जी. भास्करे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 55,45,000/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर.**

मुख्य लेखाशिर्ष : राष्ट्रपुरुषांची पुतळे व देखभाल
एकूण लेखाशिर्ष : रुपये 5,00,00,000/-
पुर्वी झालेला खर्च : रुपये निरंक
या कामावर होणारा खर्च : रुपये 55,45,000/-
शिल्लक रुपये : रुपये 4,44,55,000/-

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 49** **ठराव**

**विषय :-** **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे रुपये 55,45,000/-**

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश जा.क्रं. 3152/18 दिनांक 06.06.2018

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 55,45,000/- करिता निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/3194/18 दिनांक 07.06.2018 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/दैनिक उद्याचा मराठवाडा या वृत्तपत्रात दिनांक 08.06.2018 अन्वये निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा समितीसमोर दिनांक 12.07.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | -- |
|---|---|---|---|
| 01 | बी.जी. भास्करे, नांदेड | 0.99% कमी दर | L1 |
| 02 | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | अंदाजपत्रकीय दर | L2 |
| 03 | सयीम कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% जास्त दर | L3 |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार बी.जी. भास्करे नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. **करिता सदर कामासाठी बी.जी. भास्करे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 55,45,000/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

मुख्य लेखाशिर्ष : राष्ट्रपुरुषांची पुतळे व देखभाल
एकूण लेखाशिर्ष : रुपये 5,00,00,000/-
पुर्वी झालेला खर्च : रुपये निरंक
या कामावर होणारा खर्च : रुपये 55,45,000/-
शिल्लक रुपये : रुपये 4,44,55,000/-

**विषय क्रं. 04**

**विषय :-** **Tender for Bioremediation/Bio-mining of Old Dumped MSW at Dumping/Trenching Ground at Nanded Waghala या कामासाठी निविदा मंजुरी बाबत**

घनकचरा व्यवस्थापन नियम-2006 नुसार Tender for Bioremediation / Bio-mining of Old Dumped MSW at Dumping / Trenching Ground at Nanded Waghala या कामासाठी Tender Notice No. NWCMC/Sanit./3615/2018, दिनांक 13.06.2018 अन्वये वर्तमानपत्रात टेन्डर नोटीस प्रसिध्द करुन ई-टेन्डरिंग मार्फत ऑनलाईन प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 04 चार निविदा प्राप्त झाले.

प्राप्त चार निविदेची तांत्रीक लिफाफा (Technical bid) उघडून निविदा समितीसमोर ठेवून दिनांक 20.07.2018 रोजी सर्व तांत्रीक बाबी तपासले असता सर्व चारही निविदा Eligible (पात्र) झाला. पात्र चार निविदाधारकचे दरपत्रक (Financial bid) उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Name of the company | Rate |
|---|---|---|
| 01 | S.J. Patil | 522 |

| | | |
|---|---|---|
| 02 | Save Environment Management & Engineering Pvt. Ltd | 480 |
| 03 | Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur | 410 |
| 04 | E Tech Project | 446 |

निविदा समिती समोर उघडण्यात आलेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी L1 दराची निविदा दर रकफ. 410/- या प्रमाणे Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur यांची असल्याने संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले संबंधीतांने वाटाघाटी अंती रुपसये 410/- घ्नमिटर या प्रमाणे लेखी समंती दिली आहे.

करिता Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur यांची वाटाघाटी अंती रुपये 410/- घनमिटर (अक्षरी रुपये चारशे दहा प्रती घनमिटर फक्त) ची निविदा मंजुर करणेस प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात येत आहे तसेच निविदा अटी शर्तीसह करारनामा करणेस मान्यता मिळणेस निविदा प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 35 (अ) नुसार मान्यता होणेस विनंती आहे.

**स. शेर अली** बायोमायनिंगचे काम अत्यंत चांगले आहे. हैदरबाग ट्रेंचींग ग्राऊडच्या बायोमायनिंगचे काम करण्यात येणार असे मला पत्र देण्यात आले होते. त्या कच-यावर प्रोसेस करण्यासाठी कोणताही डीपीआर तयार करण्यात आलेला नाही.

**सभापती** हैदरबाग ट्रेंचींग ग्राऊंडचा डीपीआर तयार करण्याची मान्यता याच सभेत देण्यात येते व 14 व्या वित्त आयोगातुन सदरचा निधी खर्च करण्यात यावा. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 50** **ठराव**

**विषय :- Tender for Bioremediation/Bio-mining of Old Dumped MSW at Dumping/Trenching Ground at Nanded Waghala या कामासाठी निविदा मंजुरी बाबत**

घनकचरा व्यवस्थापन नियम-2006 नुसार Tender for Bioremediation / Bio-mining of Old Dumped MSW at Dumping / Trenching Ground at Nanded Waghala या कामासाठी Tender Notice No. NWCMC/Sanit./3615/2018, दिनांक 13.06.2018 अन्वये वर्तमानपत्रात टेन्डर नोटीस प्रसिध्द करुन ई-टेन्डरिंग मार्फत ऑनलाईन प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 04 चार निविदा प्राप्त झाले.

प्राप्त चार निविदेची तांत्रीक लिफाफा (Technical bid) उघडून निविदा समितीसमोर ठेवून दिनांक 20.07.2018 रोजी सर्व तांत्रीक बाबी तपासले असता सर्व चारही निविदा Eligible (पात्र) झाला. पात्र चार निविदाधारकचे दरपत्रक (Financial bid) उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Name of the company | Rate |
|---|---|---|
| 01 | S.J. Patil | 522 |
| 02 | Save Environment Management & Engineering Pvt. Ltd | 480 |
| 03 | Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur | 410 |
| 04 | E Tech Project | 446 |

निविदा समिती समोर उघडण्यात आलेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी L1 दराची निविदा दर रकफ. 410/- या प्रमाणे Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur यांची असल्याने संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले संबंधीतांने वाटाघाटी अंती रुपसये 410/- घ्नमिटर या प्रमाणे लेखी समंती दिली आहे.

करिता Jan-Adhar Sevebhabi Sastha Latur यांची वाटाघाटी अंती रुपये 410/- घनमिटर (अक्षरी रुपये चारशे दहा प्रती घनमिटर फक्त) ची निविदा मंजुर करणेस प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात येत आहे तसेच निविदा अटी शर्तीसह करारनामा करणेस मान्यता मिळणेस निविदा प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 35 (अ) नुसार हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 05**

**विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत विविध पद भरती प्रक्रिये बाबत चहा, फराळ, जेवण अल्पोहाराची / बॅनर टेन्ट खुर्च्या टेबल मॅटची व्यवस्था मुलाखतीच्या वेळी करणे बाबत**

**संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/836/17 दिनांक 19.04.2018**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत हैदरबाग येथे नागरी आरोग्य केंद्रासाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात विविध पदे भरण्या करिता दिनांक 22.04.17 व 25.04.17 रोजी कस्तुरबा मातृसेवा केंद्र शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या मागे नाना नानी पार्क येथे थेट मुलाखत घेण्यात आली होती. सदरील मुलाखतीस उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार, जेवण, चाय तसेच उकत पदासाठी उपस्थित राहणा-या परिक्षार्थ्यांना बसण्यासाठी टेन्ट, खुर्च्या टेबल मॅटची व्यवस्था करण्यासाठी संदर्भीय आदेशान्वये डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन सहा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी मनपा नांदेड यांना अग्रीम रक्कम रुपये 20,000/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) देण्यात आले होते.

तदनंतर उक्त थेट मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार, जेवण, ई. व्यवस्था करण्यात आली होती त्यानुसार संबंधीत अधिकारी यांना देण्यात आलेल्या अग्रीम रक्कम रुपये 20,000/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) चे समायोजन केलेले असुन त्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या अग्रीम रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 51** **ठराव**

**विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत विविध पद भरती प्रक्रिये बाबत चहा, फराळ, जेवण अल्पोहाराची / बॅनर टेन्ट खुर्च्या टेबल मॅटची व्यवस्था मुलाखतीच्या वेळी करणे बाबत**

**संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/836/17 दिनांक 19.04.2018**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत हैदरबाग येथे नागरी आरोग्य केंद्रासाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात विविध पदे भरण्या करिता दिनांक 22.04.17 व 25.04.17 रोजी कस्तुरबा मातृसेवा केंद्र शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या मागे नाना नानी पार्क येथे थेट मुलाखत घेण्यात आली होती. सदरील मुलाखतीस उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार, जेवण, चाय तसेच उकत पदासाठी उपस्थित राहणा-या परिक्षार्थ्यांना बसण्यासाठी टेन्ट, खुर्च्या टेबल मॅटची व्यवस्था करण्यासाठी संदर्भीय आदेशान्वये डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन सहा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी मनपा नांदेड यांना अग्रीम रक्कम रुपये 20,000/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) देण्यात आले होते.

तदनंतर उक्त थेट मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार, जेवण, ई. व्यवस्था करण्यात आली होती त्यानुसार संबंधीत अधिकारी यांना देण्यात आलेल्या अग्रीम रक्कम रुपये 20,000/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) चे समायोजन केलेले असुन त्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 06**

**विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत विविध पद भरती प्रक्रिये उपस्थित अधिकारी कर्मचा-यांना अल्पोहार पुरविण्यासाठी अग्रीम रक्कमेचा समायोजन करणे बाबत**

**संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/5391/17 दिनांक 18.07.2017**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत व नांदेड शहर क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध अभिनामाचे पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्याकरिता दिनांक 28.07.17, 29.07.17, 31.07.17 व 01.08.17 रोजी कै. शंकरराव चवहाण प्रेक्षागृह श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम परिसर नांदेड येथे थेट मुलाखत घेण्यात आली होती सदरील मुलाखतीस उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार तसेच उक्त पदासाठी उपस्थित राहणा-या परिक्षार्थ्यांना बसण्यासाठी टेन्ट, खुर्च्या, टेबल मॅट ची व्यवस्था करण्यासाठी संदर्भीय आदेशान्वये डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन वैद्यकिय अधिकारी मनपा नांदेड यांना अग्रीम रक्कम रुपये 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) देण्यात आले होते.

तदनंतर उक्त थेट मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार इत्यादीची व्यवस्था करण्यात आली होती त्यानुसार संबंधीत अधिकारी यांनी देण्यात आलेल्या अग्रीम रक्कम रुपये 50,000/- चे समायोजन केलेले असुन त्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या अग्रीम रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 52** **ठराव**

**विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत विविध पद भरती प्रक्रिये उपस्थित अधिकारी कर्मचा-यांना अल्पोहार पुरविण्यासाठी अग्रीम रक्कमेचा समायोजन करणे बाबत**

**संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/5391/17 दिनांक 18.07.2017**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत व नांदेड शहर क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध अभिनामाचे पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्याकरिता दिनांक 28.07.17, 29.07.17, 31.07.17 व 01.08.17 रोजी कै. शंकरराव चवहाण प्रेक्षागृह श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम परिसर नांदेड येथे थेट मुलाखत घेण्यात आली होती सदरील मुलाखतीस उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार तसेच उक्त पदासाठी उपस्थित राहणा-या परिक्षार्थ्यांना बसण्यासाठी टेन्ट, खुर्च्या, टेबल मॅट ची व्यवस्था करण्यासाठी संदर्भीय आदेशान्वये डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन वैद्यकिय अधिकारी मनपा नांदेड यांना अग्रीम रक्कम रुपये 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) देण्यात आले होते.

तदनंतर उक्त थेट मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अल्पोहार इत्यादीची व्यवस्था करण्यात आली होती त्यानुसार संबंधीत अधिकारी यांनी देण्यात आलेल्या अग्रीम रक्कम रुपये 50,000/- चे समायोजन केलेले असुन त्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 07** **अपिल** **दिनांक 06.06.2018**

**प्रति,**

**मा. सभापती साहेब,**

**स्थायी समिती,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**विषय :-** बिएसयुपी योजने अंतर्गत कामाला लावण्यात आलेला दंड माफ करणे बाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणास विनंती अर्ज सादर करण्यात येते की, बिएसयुपी योजने अंतर्गत महेबुब नगर, रामराहिमनगर, या झोपडपट्टी भागात गरीब लोकांचे घरकुल बांधकाम केले आहे. सदरील भागात अरुंद रस्ते कच्चे रस्ते असल्यामुळे बांधकाम साहित्य स्थळावर नेण्यास विलंब लागत होता पावसाळयात कच्चे रस्त्यावर चिखल झाल्याने काम बंद ठेवावे लागले तसेच लाभार्थ्यांनी त्यांच्या लाभार्थी हिस्साची रक्कम भरल्यानंतर त्यांच्या सोईनुसार त्यांनी कच्चे घरे खाली करुन देत होते. आम्हाला एकाच वेळेत सर्व घरकुले बांधकामासाठी मिळाली नाहीत. म्हणुन बांधकामासाठी उशिर झाला आहे त्यामुळे कामात उशिर झाल्याने आम्हाला दंड लावण्यात आला आहे. सदर दंडाची रक्कम महेबुबनगर येथील कामाच्या देयकातुन देयक क्रं. 8, 12, 15 व 16 च्या देयकेतुन रुपये 9,22,574/- व रामरहिमनगर येथील देयक क्रं. 08 ते 10 या देयकातुन रुपये 29,200/- असे एकूण रुपये 9,51,774/- कपात करण्यात आलेली आहे.

उपरोक्त बाबीचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन आम्हाला लावण्यात आलेला दंड माफ करावे हि विनंती.

**स्वाक्षरीत/-**

**मास्टर कन्सट्रक्शन मुंबई**

**आनंद चव्हाण** प्रशासनाचे मत सांगावे.

**कार्यकारी अभियंता(बीएसयुपी)** बीएसयुपी योजनेची घरे बांधत असतांना आपण कंत्राटदारास दंड लावण्यात आलेला आहे. तो दंड माफ करता येतो. लोकांनी घरे वेळेवर खाली न केल्या मुळे विलंब झालेला आहे.

**सभापती** मास्टर कन्सट्रक्शन मुंबई यांना लावण्यात आलेला दंड माफ करण्याची केलेली अपिल मंजुर करण्यता येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 53** **ठराव**

**मास्टर कन्सट्रक्शन मुंबई** यांनी बिएसयुपी योजने अंतर्गत **महेबुब नगर, रामरहिमनगर**, या झोपडपट्टी भागात गरीब लोकांचे घरकुल बांधकाम केले आहे. सदरील भागात अरुंद रस्ते कच्चे रस्ते असल्यामुळे बांधकाम साहित्य स्थळावर नेण्यास विलंब लागत होता पावसाळयात कच्चे रस्त्यावर चिखल झाल्याने काम बंद ठेवावे लागले तसेच लाभार्थ्यांनी त्यांच्या लाभार्थी हिस्साची रक्कम भरल्यानंतर त्यांच्या सोईनुसार त्यांनी कच्चे घरे खाली करुन देत होते. आम्हाला एकाच वेळेत सर्व घरकुले बांधकामासाठी मिळाली नाहीत. म्हणुन बांधकामासाठी उशिर झाला आहे त्यामुळे कामात उशिर झाल्याने आम्हाला दंड लावण्यात आला आहे. सदर दंडाची रक्कम महेबुबनगर येथील कामाच्या देयकातुन देयक क्रं. 8, 12, 15 व 16 च्या देयकेतुन रुपये 9,22,574/- व रामरहिमनगर येथील देयक क्रं. 08 ते 10 या देयकातुन रुपये 29,200/- असे एकूण रुपये 9,51,774/- कपात करण्यात आलेली असुन सदरचा लावण्यात आलेला दंड माफ करण्यासाठी केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 08** **अपिल** **दिनांक :- 22.06.18 प्राप्त दि. 26.06.18**

**प्रति,**

**मा.सभापती साहेब,**

स्थायी समिती,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**विषय** :- कामावर रुजु करुन घेणे बाबत

**संदर्भ** :- मनपाचे पत्र जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2582/18 दिनांक 25.05.2018 पत्र प्राप्त दिनांक 01.06.2018 प्रमाणे उत्तर दिनांक 02.06.2018 मार्फत मा. अधिक्षक नांदेड जिल्हा कारागृह वर्ग-2

**मा.महोदय,**

वरील विषयी व संदर्भीय पत्रानुसार विनंती अर्ज सादर करण्यात येते की, मी अर्जदार नामे राजेश गोपाळराव माळवतकर रा. चौफाळा नांदेड येथील रहिवाशी असून मी आपले कार्यालय नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत पाणी पुरवठा विभागात पंप ऑपरेटर या पदावर दिनांक 18.08.2007 पासून एकत्रीत वेतनावर कार्यरत होतो सध्या पोलीस स्टेशन इतवारा अंतर्गत कलम 302 या गुन्हयामध्ये संशयीत आरापी म्हणून खोटया आरोपात मी न्यायालयीन बंदी म्हणून नांदेड जिल्हा कारागृहात दाखल होतो. माझ्यावरील आरोप हा निरर्थक असून जाणून बुजून राजकिय व्देशापोटी नोंदविला आहे. या कारणाने मी मनपाकेच्या सेवेत आपल्या कर्तव्यावर हजर राहु शकलो नाही. सदर प्रकरण हे न्याय प्रविष्ठ असून माझ्यावरील आरोपात काडीमात्र संबंधी नाही माझ्यावर मागील काळात कोणताच गुन्हा दाखल झाला नाही. आणि या वेळेस सुध्दा मला संशयाने हेतुपुरस्पर अडकवलेले आहे. मा. न्यायालयाकडून मला योग्यतो न्याय मिळेलच सध्या मला मा. न्यायालयाकडून दिनांक 08.06.2018 रोजी जामीनावर कारागृहातुन मुक्तता मिळाली आहे सदरील प्रकरण हे मा. सत्र न्यायालय नांदेड येथे न्याय प्रविष्ठ असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुल मला पुर्वी प्रमाणे मनपाकेच्या सेवेत रुजु करुन घेण्यात यावे ही विनंती.

तरी मे. साहेबांनी माझ्या 10 वर्ष केलेल्या सेवेचा विचार करुन व मी आणि माझ्या पुर्णपने निर्भर असलेल्या कुटंबियाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन आमच्यावर उपासमारीची वेळ येणार नाही याची दखल घेवुन मे. साहेबांनी मला पुर्व प्रमाणे सेवेत सामावुन घ्यावे कारण की मी व माझे कुटूंब पुर्नरवसीत होण्यासाठी मला मनपाकेच्या सेवेचा मोठा आधार असल्याने या बाबीचा गांभीर्याने विचार करुनम ला आपल्या सेवेची पुर्वी प्रमाणे पुनश्च संधी द्यावी हीच आपणास माझी कळकळीची व नम्रतेची विनंती आहे.

आपला विश्वासु,

स्वाक्षरीत/-

**राजेश गोपाळराव माळवतकर**

रा. चौफाळा नांदेड एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर

<u>प्रशासकिय अहवाल</u>

श्री राजेश गोपाळराव माळवतकर हे एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर म्हणुन सेवेत कार्यरत असतांना त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन इतवारा येथे गु.रं.नं. 145/2017 कलम 302, 323, 34 भा.द.वि. व 4/25 भाहक कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन सदरचे प्रकरण गंभीर स्वरुपाचे असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. संबंधीतावर दाखल झालेल्या गंभीर गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता व ते कंत्राटीवरील कर्मचारी असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरीसेवा नियम लागु होत नसल्याने त्यांना स्थायी समितीकडे अपील करण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे संबंधीतास सेवेत सामावुन घेता येणार नाही.

**सभापती** श्री राजेश गोपाळराव माळवतकर हे एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर म्हणुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन इतवारा नांदेड येथे गुन्हा दाखल झाल्यामुळे संबंधीतास कामावरुन कमी केलेल्या आदेशा विरुध्द अपिल केलेली असुन संबंधीतास गंभीर स्वरुपाचे गुन्हा दाखल झालेला असुन त्यामुळे संबंधीतांची अपिल प्रशासकीय अहवालानुसार मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 54** **ठराव**

**प्रति,**

**मा.सभापती साहेब,**

स्थायी समिती,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**विषय** :- कामावर रुजु करुन घेणे बाबत

**संदर्भ** :- मनपाचे पत्र जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2582/18 दिनांक 25.05.2018 पत्र प्राप्त दिनांक 01.06.2018 प्रमाणे उत्तर दिनांक 02.06.2018 मार्फत मा. अधिक्षक नांदेड जिल्हा कारागृह वर्ग-2

**मा.महोदय,**

श्री राजेश गोपाळराव माळवतकर हे एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर म्हणुन या पदावर दिनांक 18.08.2007 पासून एकत्रीत वेतनावर कार्यरत होतो सध्या पोलीस स्टेशन इतवारा अंतर्गत कलम 302 या गुन्हयामध्ये संशयीत आरोपी म्हणून खोटया आरोपात संबंधीतास न्यायालयीन बंदी म्हणून नांदेड जिल्हा कारागृहात दाखल होते. संबंधीतांचे आरोप हा निरर्थक असून जाणून बुजून राजकिय व्देशापोटी नोंदविला आहे. या कारणाने संबंधीत मनपाकेच्या सेवेत आपल्या कर्तव्यावर हजर राहु शकलो नाही. त्यामुळे का.आ. क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2582/18 दिनांक 25.05.2018 अन्वये संबंधीतास कायमचे कामावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर प्रकरण हे न्याय प्रविष्ठ असून माझ्यावरील आरोपात काडीमात्र संबंधी नाही

संबंधीतास हे मागील काळात कोणताच गुन्हा दाखल झाला नाही. आणि या वेळेस सुध्दा मला संशयाने हेतुपुरस्पर अडकवलेले आहे. मा. न्यायालयाकडून मला योग्यतो न्याय मिळेलच सध्या संबंधीत हे मा. न्यायालयाकडून दिनांक 08.06.2018 रोजी जामीनावर कारागृहातुन मुक्तता मिळाली आहे सदरील प्रकरण हे मा. सत्र न्यायालय नांदेड येथे न्याय प्रविष्ठ असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुल मला पुर्वी प्रमाणे मनपाकेच्या सेवेत रुजु करुन घेण्यात यावे म्हणुन स्थायी समिती समोर अपिल दाखल केली होती.

तथापि श्री राजेश गोपाळराव माळवतकर हे एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर म्हणुन सेवेत कार्यरत असतांना त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन इतवारा येथे गु.रं.नं. 145/2017 कलम 302, 323, 34 भा.द.वि. व 4/25 भाहक कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन सदरचे प्रकरण गंभीर स्वरुपाचे असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. संबंधीतावर दाखल झालेल्या गंभीर गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता व ते कंत्राटीवरील कर्मचारी असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरीसेवा नियम लागु होत नसल्याने त्यांना स्थायी समितीकडे अपील करण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे संबंधीतास सेवेत सामावुन घेता येणार नाही अशी प्रशासनाने आपला प्रशासकिय अहवाल सादर केल्यामुळे प्रशासकिय अहवालानुसार संबंधीतांचे अपिल नामंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 09** **अपिल**

**प्रति,** **दिनांक 2.06.18 प्राप्त दि. 05.07.2018**

**मा.सभापती**

**स्थायी समिती**

नांदेडवाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**विषय** :- अपिल स्थायी समिती समोर ठेवणे बाबत

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-3/15282/17 दिनांक 15.01.2018

**महोदय,**

वरील विषयी सविनय विनंतीपुर्वक अर्ज सादर करण्यता येतो की मी दिपक रामा धवडगे पुरुष मजुर आरोग्य विभाग नावाशमनपा नांदेड येथे कार्यरत असून संदर्भीय आदेशान्वये दि. 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत (95) दिवसाचा गैरहजरीचा कालावधी विना वेतन करण्यात आलेला आहे.

तत्पुर्वी माझे घरी शेजा-याशी घरगुती भांडण झालेले होते त्या भांडनातुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन नांदेड येथे गु.रं.नं. 201/2010 कलम 376, 420 भा.द.वि. प्रमाणे दिनांक 03.12.2010 रोजी दाखल करण्यात आलेला होता सदर प्रकरणी अटकपुर्व जामीन मिळवण्यासाठी मला मनपा कर्तव्य सोडून अज्ञात स्थळी रवाना व्हावे लागले. त्यामुळे मनपा प्रशासनाने दिलेल्या नोटीसीचे उत्तर वेळेत सादर करता आले नाही. प्रकरणाची सखोल चौकशी पोलीस प्रशासनाने करुन माझ्या विरोधात न्यायालयीन प्रकरण क्रं. 58/2011 दिनांक 17.01.2017 रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले त्यामध्ये मी निर्दोश आढळून आलेलो आहे व तसा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. परंतु दिनांक 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत 95 दिवसाचा अनुपस्थिती कालावधी विनावेतनी करण्यात आलेला आहे माझ्यावर आलेल्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 56(3) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांचा कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/15282/17 दिनांक 15.01.2018 हा रद्द करुन लादलेली शास्ती माफ करणेचे अधिकारी मा. स्थायी समितीस असल्यामुळे माझी शास्ती माफ करु सदरचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्याची मान्यता प्रदान करावी ही नम्र विनंती.

**आपला नम्र,**

**स्वाक्षरीत/-**

**दिपक रामा धवडगे, पुरुष मजुर, नावाशमनपा नांदेड**

**<u>प्रशासकिय अहवाल</u>**

श्री दिपक रामा धबडगे, पुरुष मजुर यांना घरगुती भांडण्यातुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन नांदेड येथे गु.रं.नं. 201/2010 कलम 376, 420 भा.द.वि प्रमाणे दिनांक 03.12.2010 रोजी दाखल करण्यात संबंधीतांना कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-3/10157/11 दिनांक 07.03.2011 अन्वये निलंबीत करण्यात आले होते. निलंबन प्रकरणी ज्ञापन व जोडपत्र 1 ते 4 बजावुन खुलासा मागविण्यात आला असता त्यांनी त्यांचेवर लादलेले दोषारोप अमान्य केल्यामुळे चौकशी अधिकारी यांची नेमणुक करुन सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप क्रं. 1 व 2 सतत गैरहजर राहणे व स्पष्टीकरण सादर न करणे हे दोन्ही दोषारोप सिध्द झाला आहे व दोषारोप क्रं. 3 मध्ये न्यायप्रविष्ठ प्रकरणात मा. न्यायालयांनी त्यांना दोषमुक्त केले आहे त्यामुळे संबंधीतांचा निलंबनपुर्वीचा दिनांक 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत (95) दिवसाचा गैरहजर कालावधी हा विनावेतनी करण्यात येवुन त्यांचा निलंबन कालावधी हा दिनांक 07.03.2011 ते 15.04.2012 पर्यंतचा कर्तव्यकाळ धरण्यात आला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2) ब नुसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यांवर/कर्मचा-यांवर शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानुसार संबंधीतास उक्त अधिनियमातील 56(2)ब मधील तरतुदीनुसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतुका खंड (ड) च्या तरतुदीच्या अधिन राहुन ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यांस किंवा कर्मचा-यांस महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, तर त्यास खालच्या पदावर आणण्याच्या काढून टाकण्याच्या किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करता येईल अशी तरतुद आहे.

करिता संबंधीतांनी सदरील प्रकरणी 01 महिण्याच्या आत पिल केलेले नाही तसेच ते निलंबन पुर्वी ते दिनांक 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत (95) दिवसाचा गैरहजर होत सिध्द झाल्यामुळे त्यांचा गैरहजर कालावधी हा असाधारण रजेत समाविष्ठ केलेला आहे त्यांचे विरुध्द लादलेली शास्ती किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे ती उक्त नियमातील तरतुदीनुसार रद्द करता येणार नाही.

**सभापती** संबंधीतांची अपिल मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. 55** **ठराव**

**दिपक रामा धवडगे पुरुष मजुर** आरोग्य विभाग नावाशमनपा नांदेड येथे कार्यरत असून कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-3/15282/17 दिनांक 15.01.2018 आदेशान्वये दि. 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत (95) दिवसाचा गैरहजरीचा कालावधी विना वेतन करण्यात आलेला आहे.

तत्पुर्वी माझे घरी शेजा-याशी घरगुती भांडण झालेले होते त्या भांडनातुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन नांदेड येथे गु.रं.नं. 201/2010 कलम 376, 420 भा.द.वि. प्रमाणे दिनांक 03.12.2010 रोजी दाखल करण्यात आलेला होता सदर प्रकरणी अटकपुर्व जामीन मिळवण्यासाठी मला मनपा कर्तव्य सोडून अज्ञात स्थळी रवाना व्हावे लागले. त्यामुळे मनपा प्रशासनाने दिलेल्या नोटीसीचे उत्तर वेळेत सादर करता आले नाही. प्रकरणाची सखोल चौकशी पोलीस प्रशासनाने करुन माझ्या विरोधात न्यायालयीन प्रकरण क्रं. 58/2011 दिनांक 17.01.2017 रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले त्यामध्ये मी निर्दोश आढळून आलेलो आहे व तसा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. परंतु दिनांक 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत 95 दिवसाचा अनुपस्थिती कालावधी विनावेतनी करण्यात आलेला आहे माझ्यावर आलेल्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 56(3) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांचा कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/15282/17 दिनांक 15.01.2018 हा रद्द करुन लादलेली शास्ती माफ करणेचे अधिकारी मा. स्थायी समितीस असल्यामुळे माझी शास्ती माफ करु सदरचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्याची मान्यता प्रदान करावी म्हणुन स्थायी समितीची समोर अपिल सादर केली होती.

तथापि **दिपक रामा धवडगे पुरुष मजुर** यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2) ब नुसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यांवर/कर्मचा-यांवर शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानुसार संबंधीतास उक्त अधिनियमातील 56(2)ब मधील तरतुदीनुसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतुका खंड (ड) च्या तरतुदीच्या अधिन राहुन ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यांस किंवा कर्मचा-यांस महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, तर त्यास खालच्या पदावर आणण्याच्या काढून टाकण्याच्या किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करता येईल अशी तरतुद आहे.

करिता संबंधीतांनी सदरील प्रकरणी 01 महिण्याच्या आत पिल केलेले नाही तसेच ते निलंबन पुर्वी ते दिनांक 02.12.2010 ते 06.03.2011 पर्यंत (95) दिवसाचा गैरहजर होत सिध्द झाल्यामुळे त्यांचा गैरहजर कालावधी हा असाधारण रजेत समाविष्ठ केलेला आहे त्यांचे विरुध्द लादलेली शास्ती किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे ती उक्त नियमातील तरतुदीनुसार रद्द करता येत नसल्याचे प्रशासनाने लेखी कळविल्यानुसार संबंधीताचा अर्ज नामंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 10** **अपिल** **दिनांक 18.07.2018**

**प्रति,**

**मा. सभापती**

**स्थायी समिती,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका

नांदेड

**विषय** :- <u>न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथील घरकुल बांधकामास लागलेला दंड माफ करणे बाबत</u>

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथे 85 घरकुलांचे कार्यारंभ आदेश प्राप्त झाले असुन त्यापैकी 39 घरकुलांचे मार्कआऊट देण्यात आले होते. घरकुलांचे बांधकाम करते वेळेस लाभार्थ्यांनी राहते घर रिकामे न केल्यामुळे बांधकामास विलंब झाला त्यामुहे रुपये 70,200/- दंड आकारण्यात आला आहे. करिता सदर आकारण्यात आलेला दंड माफ करण्यात यावा हि नम्र विनंती

**आपला विश्वासु,**

**स्वाक्षरीत/-**

**श्रध्दा इलेक्ट्रीकल्स नांदेड**

**सभापती** श्रध्दा इलेक्ट्रीकल्स कंत्राटदार नांदेड यांनी न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथील घरकुल बाधंकम करतांना लावण्यात आलेला दंडा माफ करण्यासाठी केलेली अपिल मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 56** **ठराव**

**श्रध्दा इलेक्ट्रीकल्स नांदेड कंत्राट यांनी न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी)** येथे 85 घरकुलांचे कार्यारंभ आदेश प्राप्त झाले असुन त्यापैकी 39 घरकुलांचे मार्कआऊट देण्यात आले होते. घरकुलांचे बांधकाम करते वेळेस लाभार्थ्यांनी राहते घर रिकामे न केल्यामुळे बांधकामास विलंब झाला त्यामुळे रुपये 70,200/- दंड आकारण्यात आला आहे. करिता सदर आकारण्यात आलेला दंड माफ करण्यासाठी केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 11** **अपिल** **दिनांक 18.07.218**

**प्रति,**

**मा. सभापती**

**स्थायी समिती,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका

नांदेड

**विषय** :- <u>न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथील घरकुल बांधकामास लागलेला दंड माफ करणे बाबत</u>

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथे 100 घरकुलांचे कार्यारंभ आदेश प्राप्त झाले असुन त्यापैकी 45 घरकुलांचे मार्कआऊट देण्यात आले होते.

घरकुलांचे बांधकाम करते वेळेस लाभार्थ्यांनी राहते घर रिकामे न केल्यामुळे बांधकामास विलंब झाला त्यामुहे रुपये 2,61,350/- दंड आकारण्यात आला आहे. करिता सदर आकारण्यात आलेला दंड माफ करण्यात यावा हि नम्र विनंती

**आपला विश्वासु,**

**स्वाक्षरीत/-**

**फरहत देशमुख अन्ड सन्स लातुर**

**सभापती** फरहत देशमुख अन्ड सन्स लातुर कंत्राटदार यांनी न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी) येथील घरकुल बाधंकम करतांना लावण्यात आलेला दंडा माफ करण्यासाठी केलेली अपिल मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 57** **ठराव**

**फरहत देशमुख अन्ड सन्स लातुर कंत्राटदार यांनी न्यु मिल्लतनगर व (न्यु ब्रम्हपुरी)** येथे 100 घरकुलांचे कार्यारंभ आदेश प्राप्त झाले असुन त्यापैकी 45 घरकुलांचे मार्कआऊट देण्यात आले होते.

घरकुलांचे बांधकाम करते वेळेस लाभार्थ्यांनी राहते घर रिकामे न केल्यामुळे बांधकामास विलंब झाला त्यामुळे रुपये 2,61,350/- दंड आकारण्यात आला आहे. करिता सदर आकारण्यात आलेला दंड माफ करण्यास केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.12** **अपिल** **दिनांक 04.07.2018**

**प्रति,**

**मा. सभापती**

**स्थायी समिती,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**

**विषय** :- सोहेल कन्सट्रक्शन यांचे मनपा मधील केलेल्या कामाचे देयक देणे बाबत

**संदर्भ** :- मा. आयुक्त यांचे काळया यादीत टाकण्यात आलेला आदेश क्रं. नावाशमनपा/आकक्ष/18398/18 दि. 14.04.18

**महोदय,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयात अंतर्गत मी वेगवेगळया विभागात कामे केलेली आहेत. परंतु वार्ड क्रं. 31 (जुना) मधील अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत कामातील पाईप हे चोरीचे असल्याच्या संशयावरुन ते काम रद्द करुन मला न्यायालयीन निर्णयापर्यंत काम न करण्याचे निर्बंध घालून काळया यादीत टाकलेले आहे.

करिता संदर्भीय आदेशापुर्वी मला कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन विहित मुदतीत देण्यात आलेली कामे मी पूर्ण केली आहेत नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादाकीत काम सोडून इतर कामाची दयके मला नियमानुसार देण्यात यावी ही विनंती.

मी इतर विभागात अनेक कामे केलेली आहेत त्या कामाचे देयके स्थगित आहेत त्यामुळे मला आर्थीक अडचणीला तोंड छयावे लागत आहे व माझ्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

करिता माझ्या अपिलावर सहानुभुतीपूर्वक विचार करुन मी केलेल्या प्रभाग क्रं 31 (जुना) मधील काम वगळुन इतर विविध विभागात केलेल्या कामाचे देयके देण्याबाबत स्थायी समितीची मान्यता देण्यात यावी ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**

**मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड**

**आनंद चव्हाण** संबधीत कंत्राटदाराचे कीती देणी आहे याची माहिती दयावी. नियमात बसत असेल तर देण्यात यावे. पुढील माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** मागील देणी देता येवू शकतील परंतू जे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे ते देता येणार नाही.

**अ. लतीफ** केळी मार्केटच्या व्यापा-यांचे तीन वर्षा पासुन दुकान बंद आहे त्यामुळे ते भाडे वसुल करु नये.

**सभापती** तीन वर्षापासुन दुकाने बंद आहेत त्यामुळे ते पैसे भरण्यात तयार होत नाहीत त्यांना आलेले दंड माफ करण्यात यावे तसे असेल तर केळी मार्केटचे व्यापारी पैसे भरण्यास तयार आहेत. किराया व्यापारी देण्यात तयार आहेत तो घेण्यात यावा त्यामुळे त्यांचे पैसे नियमाप्रमाणे भरुन घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

**विधी अधिकारी** दुकान व्यापा-याच्या ताब्यात असल्याने त्यांना किराया देणे बंधन कारक आहे. परंतू दंड माफ करण्याचे अधिकार महा सभेस आहेत.

**सभापती** मे. साहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड यांचे वार्ड क्रं. 31 जुनाचे देयक वगळता इतर वार्डात केलेल्या कामाचे देयके अदाई करण्यासाठी केलेली अपिल मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 58** **ठराव**

मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड, यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयात अंतर्गत वेगवेगळया विभागात कामे केलेली आहेत. परंतु वार्ड क्रं. 31 (जुना) मधील अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत कामातील पाईप हे चोरीचे असल्याच्या संशयावरुन ते काम रद्द करुन संबंधीत कंत्राटदारास न्यायालयीन निर्णयापर्यंत काम न करण्याचे निर्बंध घालून संबंधीत एजन्सीला काळया यादीत टाकलेले आहे.

करिता आदेश क्रं. नावाशमनपा/आकक्ष/18398/18 दि. 14.04.18 आदेशापुर्वी संबंधीत कंत्राटदारास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन विहित मुदतीत देण्यात आलेली कामे संबंधीत कंत्राटदाराने पूर्ण केलेली आहेत नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादाकीत काम सोडून इतर कामाची दयके संबंधीत कंत्राटदारास नियमानुसार देण्यात यावी म्हणुन मनपा स्थायी समिती समोर अपिल केलेली आहे.

त्यानुसार संबंधीत कंत्राटदाराने इतर विभागात अनेक कामे केलेली आहेत त्या कामाचे देयके स्थगित आहेत त्यामुळे संबंधीत कंत्राटदाराला आर्थीक अडचणीला तोंड छयावे लागत आहे व संबंधीत कंत्राटदारावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

करिता मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड यांनी केलेल्या अपिलावर सहानुभुतीपूर्वक विचार करुन संबंधीत कंत्राटदाराने केलेल्या प्रभाग क्रं 31 (जुना) मधील काम वगळुन इतर विविध विभागात केलेल्या कामाचे देयके अदाई करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

<u>**विशेष बाब म्हणुन सभागृहात मांडण्यात आलेला**</u>

**विषय क्रं.** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेच्या मालकीच्या केळी मार्केट येथील संकुलातील दुकानांचे भाडेकरुंनी दुकानांचे मागील 3-4 वर्षा पासुन बंद होते त्यामुळे सदरील संकुलाचे भाडेकरुंनी दुकानांचे भाडे भरु शकले नसल्याने संबंधीत भाडेकरु चालु वर्षाच्या भाडेपटटीवर थकबाकीसहीत भाडे भरण्याचे बिले देण्यात आली ज्यामुळे आजच्या परिस्थीतीतीला संबंधीत भाडेकरुंना थकबाकी भरण्याची आर्थीक परिस्थिती नाही. करिता सदरील संकुलातील भाडेकरुंना थकबाकीसहीत भाडे भरण्याचे बिले जे देण्यात आले त्यांचे

थकबाकी माफ करुन चालु वर्षाचे कर घेण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक:-** अ. लतीफ अ. मजीद **अनुमोदक :-** अ. सत्तार अ. गफुर

**सभापती** स. सदस्यांना प्रस्ताव महासभेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 59** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या केळी मार्केट येथील संकुलातील दुकानांचे भाडेकरुंनी दुकानांचे मागील 3-4 वर्षा पासुन बंद होते त्यामुळे सदरील संकुलाचे भाडेकरुंनी दुकानांचे भाडे भरु शकले नसल्याने संबंधीत भाडेकरु चालु वर्षाच्या भाडेपटटीवर थकबाकीसहीत भाडे भरण्याचे बिले देण्यात आली ज्यामुळे आजच्या परिस्थीतीतीला संबंधीत भाडेकरुंना थकबाकी भरण्याची आर्थीक परिस्थिती नाही.

करिता वरील संकुलातील भाडेकरुंना थकबाकीसहीत भाडे भरण्याचे बिले जे देण्यात आले त्यांचे थकबाकी वरील व्याज माफ करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच इतर भाडेकरुचे भाडेवाढ हे बाजार भावा प्रमाणे करण्यात येत असुन तथापि सदरील केळी मार्केट येथील भाडेकरुंचे भाडेवाढ करतांना रेडीरेकनरच्या 40 टक्कयाने भाडेवाढ करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यता येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगसचिव**
**नावाशमनपा नांदेड**

**स्वाक्षरीत/-**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**नावाशमनपा नांदेड**